पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/४/कावि/ १२५३ /२०१२
दिनांक- ०९/१०/२०१२

प्रति,

मा.........................................
सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८

विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा. महापालिका सभा दिनांक १९/१०/ २०१२ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेबाबत...

माननिय महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे ऑक्टोंबर-२०१२ ची मासिक मा.महापालिका सभा शुक्रवार दिनांक १९/१०/२०१२ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत :- १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८

सूचना

[ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची प्रकरण २ मधील नियम क्रमांक १ (ए)(एच)(आय) अन्वये. ]

**कार्यपत्रिका क्रमांक- ९**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे ऑक्टोंबर-२०१२ ची मासिक मा.महापालिका सभा शुक्रवार दिनांक १९.१०.२०१२ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारती मधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेमध्ये खालील कामकाज होईल.

----------

(अ) मा.महापालिका सभा क्र. ६ दि.२०/७/२०१२ (दु.२.०० व दु.२.३०), ३/८/२०१२, १७/८/२०१२ (दु.३.००), व १/९/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.

(ब) मा.महापालिका सभा क्र. ७ दि. १७/८/२०१२ व १/९/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.

**प्रश्नोत्तरे**

[ मुंबई प्रांतिक म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम ४४ अन्वये ]

-----------

**मा. स्थायी समितीचे ठराव**

विषय क्रमांक १) संदर्भः- १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. जकात/१०/कावि/९९/१२ दि. १९/३/२०१२
२) मा.विधी समिती सभा दिनांक २१/०७/२०१२ ठराव क्र.३५
३) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.८५२ दि.३१/७/२०१२
४) मा.महापालिका सभा ठ.क्र.११३ दि.२०/९/२०१२ अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका जकात नियम २००१ चे अनुसूची १ व २ मधील दर समानिकरणाकामी प्रस्तावा सोबत प्रपत्र अ जोडले असून त्यामध्ये प्रपत्र ब च्या यादीप्रमाणे एकूण १८ बाबींच्या नमूद मालावर प्रस्तावित केलेले सुधारित जकात दर कायम करणेस व त्या प्रमाणेचे अनुसुचीबाबत नागरिकांच्या हरकती सुचना मागविणेस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

(टिप- माहे आक्टोबर-२०१२ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे )

विषय क्रमांक २) संदर्भः- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.
वैद्य/७/कावि/२१६५/१२ दि.७/८/२०१२
२) मा.स्थायी समिती कडील ठ.क्र.९०६ दि.१४/८/२०१२
३) मा.महापालिका सभा.ठ.क्र.११४ दि.२०/९/२०१२ अन्वये

मनपा कर्मचारी महासंघ, पिंपरी यांनी त्यांचेकडील दि.१२/४/२०१२ चे पत्रान्वये सद्यस्थितीत पेन्शन रकमेमध्ये वाढ झालेली असलेमुळे वैद्यकीय प्रतिपुर्ती व वैद्यकीय अग्रीम धोरणा मधील र.रू.३,०००/- ची अट शिथिल करणेस विनंती केलेली असून सहाव्या वेतन आयोगानुसार पेन्शनमध्ये तुलनात्मक दृष्ट्या जेवढी वाढ झाली आहे. तेवढी वाढ र.रू.३,०००/- च्या मर्यादेत (In proportion of ration) नुसार प्रस्तावित करणे आवश्यक असून प्रस्तुत प्रकरणी मुख्य लेखापाल यांचेकडील प्राप्त अभिप्रायानुसार वैद्यकीय प्रतिपुर्ती व वैद्यकीय अग्रीम धोरणामधील “निवृत्ती वेतन घेत असलेले मनपा कर्मचाऱ्याचे आई वडील हे त्याचे कमाल उत्पन्न दरमहा (मुळ वेतन) र.रू.६,७८२/- असेल तर या अटीस अधीन राहून मनपा कर्मचाऱ्यांवर अवलंबुन नसल्याचे समजण्यात येईल ” अशी मा.आयुक्त यांची शिफारस असली तरी सदरची अट वगळणेत येवून वैद्यकीय प्रतिपूर्ती व अग्रीम धोरण ठरविणेस मान्यता देणेत यावी अशी महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.
(टिप- माहे आक्टोबर-२०१२ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे )

विषय क्रमांक ३) संदर्भः- १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.जशुके/वि/२७०/१२ दि.७/८/२०१२
२) मा.स्थायी समिती कडील ठ.क्र.९३७ दि. २८/८/२०१२
३)मा.महापालिका सभा ठ.क्र.११५ दि.२०/९/२०१२ अन्वये.

सन २०१२-१३ साठी अंदाजपत्रकात शुध्द अशुध्द जलउपसा केंद्र से.२३ या लेखाशिर्षावर मागील वर्षाइतकी र.रू.३=२५ कोटी तरतूद मिळाल्यामुळे पाणीपुरवठा विभागाकडून होत असलेल्या कामास अनुसरून विद्युत विभागाकडून कामे करणे विशेष योजना पाणीपुरवठा टप्पा-१ या लेखाशिर्षावरील र.रू.५ कोटी शुध्दअशुध्द जलउपसाकेंद्र से.२३ या लेशाशिर्षावर प्रस्तावासोबतचे प्रपत्र अ प्रमाणे वर्ग करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.
(टिप- माहे आक्टोबर-२०१२ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे )

विषय क्रमांक ४) संदर्भः- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मुका/वि/कावि/३३२/१२
दि.११/९/२०१२
२) मा.स्थायी समिती कडील ठ.क्र.११७४.दि. १८/९/२०१२.

मनपा प्रशासकीय इमारतीसाठी वापरात असलेल्या अग्नीशमन यंत्रणेचे नुतनीकरण करणे कामास अग्नीशामक विभागाचे सन २०१२-१३ चे अंदाजपत्रकातील भाग २ भांडवली “अग्नीशामक वाहन खरेदी” या लेखाशिर्षावरील र.रू.१०,००,००,०००/- मधुन र.रू. ७०,००,०००/- इतकी तरतुद विद्युत विभागाचे प्रशासकीय इमारत योजना या लेखाशिर्षावरील पृष्ठ६०२ वरील अ.क्र.०६ चे कामास वर्गीकरण करणे आवश्यक असल्याने सदरप्रमाणे तरतुद वर्ग करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक ५) संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र प्रशा/१०/कावि/१२९१/१२
दि.११/९/२०१२
२) मा.स्थायी समिती कडील ठ.क्र. ११७७.दि. १८/९/२०१२.

शासनाकडील नवीन धोरणानुसार दि.१७ फेब्रुवारी, २०१२ च्या अनुषंगाने नवीन मोटरकार खरेदीसाठी ज्या अधिकाऱ्यांचे सुधारित वेतनबँड मधील मासिक वेतन र.रू.१९,५३०/- (ग्रेड वेतन वगळून) किंवा अधिक आहे अशा राजपत्रित अधिकारी यांना अग्रीमची रक्कम त्यांचे वेतनबँड मधील मासिक वेतनाच्या १७ पट किंवा ३,५०,०००/- किंवा नवीन मोटरकारची प्रत्यक्ष किंमत यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अग्रीम देय राहील. तसेच प्रथमतः मुद्दलाची वसुली १०० समान मासिक हप्त्यात तसेच व्याज वसुली पुढे समान ६० मासिक हप्त्यात करावी. तसेच जुनी मोटरकार खरेदी करण्यासाठी अग्रीमाची रक्कम अधिकाऱ्यांच्या वेतन बँड मधील मासिक वेतनाच्या ८ पट एवढी रक्कम किंवा र.रू.१,७५,०००/- किंवा जुन्या मोटरकारची प्रत्यक्ष किंमती यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढा अग्रीम अनुज्ञेय राहील. त्याची वसुली प्रथमतः ५० समान मासिक हप्त्यात व व्याज वसुली पुढे समान ३० मासिक हप्त्यात करावी. खरेदी करावयाची जुनी मोटरकार ५ वर्षापेक्षा जुनी नसावी. सेवाभरती नियमानुसार करण्यात आलेल्या नियुक्तीनंतर कमीतकमी ५ वर्षे सलग सेवा झालेल्या अधिकाऱ्यांना शासकीय सेवेच्या कालावधीत एकदाच **अग्रीम अनुज्ञेय राहील. त्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस. करणेत येत आहे.**

**विषय क्रमांक ६) संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. वैद्य/७/कावि/२५३७/२०१२ दि.२१/९/२०१२**

२) मा.स्थायी समिती कडील ठ.क्र. १२७८.दि. २५/९/२०१२.

राष्ट्रीय कार्यक्रमाअंतर्गत गरोदर माता यांचेसाठी १) मोफत बाळंतपण २) मोफत सिझेरियन ३) मोफत औषधोपचार ४) मोफत तपासणी (पॅथोलॉजी) ५) मोफत रक्त (मनपाचे रक्तपेढीमधुन) ६) सवलत (user charges) तसेच नवजात अर्भकासाठी १) मोफत औषधोपचार २) मोफत तपासणी (पॅथालॉजी) ३) मोफत रक्त (मनपाचे रक्तपेढी मधुन) ४) सवलत (User charges) हया बाबी जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत **येत असल्याने जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमाअंतर्गत** गरोदर मातांना व नवजात अर्भकांना मनपाच्या रुग्णालयात / दवाखाना येथे मोफत औषधोपचार/सेवा देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

----------

## मा.विधी समितीचे ठराव

विषय क्रमांक ७) संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.प्रशा/१/कावि/७५८/२०१२, दि.०७/०८/२०१२

२) मा.विधी समिती कडील ठ.क्र.५० दि.३१/८/२०१२

३)मा.महापालिका सभा ठ.क्र.१२१दि.२०/९/२०१२ अन्वये

श्री. सतिश कुलकर्णी, मुख्याधिकारी गट - अ यांची सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर १ वर्ष कालावधीकरीता प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

(टिप- माहे आक्टोबर-२०१२ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे )

विषय क्रमांक ८) संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र. स्था/ श.अ.तां/१/कावि/१४८/२०१२, दि.२१/०८/२०१२

२) मा.विधी समिती कडील ठ.क्र.५१ दि.२१/९/२०१२

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील सर्व अनधिकृत बांधकामांस / बेकायदेशिर बांधकामांस यापुढे सर्व सेवा सुविधा ( उदा. पिण्याचे पाणी, सांडपाण्याची व्यवस्था, रस्ते, दिवाबत्ती इ.) देणे बंद करणेबाबतच्या निर्णयास तसेच, यापुढे या महानगरपालिका हद्दीतील बांधकामांना विद्युत जोड देणेपूर्वी महानगरपालिकेकडील बांधकाम चालू करण्याचा दाखला / महानगरपालिकेच्या संबंधित विभागाकडील नाहरकत दाखला सादर केल्यानंतरच विद्युत जोड देणेबाबत कार्यवाही करणेबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांना कळविणेस तसेच ज्या ठिकाणी १०० टक्के अनधिकृत बांधकाम झालेले असेल त्याच ठिकाणी रस्ते व दिवाबत्तीची सोय न करुन देणेस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक ९) संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
क्र.प्रशा/१/कावि/८९०/२०१२, दि.३१/०८/२०१२
२) मा.विधी समिती कडील ठ.क्र.५२ दि.२१/९/२०१२

श्री. प्रकाश कदम, अति.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दि.०७/१०/२०१२ पासून १ वर्ष कालावधीकरीता प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मुदतवाढ देणेस मान्यता देणेकामी मा. महापालिकासभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक १०) संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
क्र.मुका/वि/जा/३३१/२०१२, दि.११/०९/२०१२
२) मा.विधी समिती कडील ठ.क्र.५६ दि.२१/९/२०१२

मनपाच्या प्रशासकीय इमारतीमधील अग्नीशमन यंत्रणेसाठी नवीन रींग मेन पाईप लाईन टाकणे व अनुषंगीक कामे करणेकामी येणा-या र.रु.१,३०,००,०००/- चे प्रशासकीय खर्चास तसेच काम करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक ११) संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
क्र.प्रशा/१/कावि/९८०/२०१२, दि.१३/०९/२०१२
२) मा.विधी समिती कडील ठ.क्र.५७ दि.२१/९/२०१२

दिनांक १६/०८/२०१२ रोजीच्या पदोन्नती निवड समितीची शिफारस विचारात घेता अर्हता धारण करणारे एकमेव वैद्यकीय अधिकारी डॉ. पवन वसंत साळवे यांना "अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी " या पदावर पे बॅन्ड र.रु. १५६०० - ३९१०० ग्रेड वेतन रु.७६०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक १२) संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
क्र.डप्र/पापु/कावि/९७८/२०१२, दि.१७/०९/२०१२
२) मा.विधी समिती कडील ठ.क्र.५८ दि.२१/९/२०१२

जलक्षेत्र क्र.ड/१२ पिंपळे गुरव परिसरातील गुरुत्व वाहिनीवरील थेट पाणीपुरवठा बंद करणेकामी स.नं.७२ येथे २.० द.ल.लि.क्षमतेची टाकी बांधणेकामी येणा-या र.रु. १,३०,००,०००/- चे खर्चास व काम करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक १३)   संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
क्र.जनि/कावि/१००२/२०१२, दि.२१/०९/२०१२
२) मा.विधी समिती कडील ठ.क्र.६१ दि.२१/९/२०१२

सांगवी मैलाशुध्दीकरण केंद्रांतर्गत सांगवी मुळानगर येथे पंप हाऊसच्या मोकळया जागेत रिटेनिंगवॉल व सिमाभिंत बांधणेकामी येणा-या र.रु.९९,२२,०००/- खर्चास व कामकरणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक १४)   संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.प्रशा/१/कावि/१०४४/२०१२,  दि.२४/०९/२०१२
२) मा.विधी समिती कडील ठ.क्र.६५ दि.०५/१०/२०१२

श्रीम. आशाराणी पाटील, प्रशासन अधिकारी पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दि. ०१/११/२०१२ पासून १ वर्ष कालावधीकरीता प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मुदतवाढ देणेस मान्यता देणेकामी मा. महापालिका  सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक १५)   संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.मभां/७/कावि/३०९/२०१२,  दि.२६/०९/२०१२
२) मा.विधी समिती कडील ठ.क्र.६६ दि.५/१०/२०१२

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विदयुत , स्थापत्य, आयटीआय मोरवाडी, आरोग्य, संगणक, अतिक्रमण, उदयान, जलशुध्दिकरण केंद्र निगडी इ.विभागाचे प्रस्तावासोबतचे विभागवार तक्ता परिशिष्ट "अ" प्रमाणे भंगार साहित्याची अंदाजे किंमत र.रु.३,५४,७२,०८३/- येत आहे. सदरची किंमत र.रु.५००/- पेक्षा जास्त येत असल्याने जाहिर लिलाव करुन त्या साहित्याची विल्हेवाट लावणेकरिता मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक १६)   संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.कप्र/पापु/जनि/१०४३/२०१२, दि.०१/१०/२०१२
२) मा.विधी समिती कडील ठ.क्र.६७ दि.५/१०/२०१२

सांगवी / दापोडी मैलाशुध्दीकरण केंद्रांतर्गत दापोडी येथे स.नं. ३६ च्या जागेस सिमाभिंत बांधणेकामी येणा-या र.रु.२,५८,६२,०००/- (अक्षरी र.रु.दोन कोटी, अठ्ठावन्न लाख, बासष्ट हजार फक्त ) चे अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक १७)   संदर्भ :-१)  मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.पापु/कप्र/०४/कावि/१०४/२०१२, दि.०३/१०/२०१२
२) मा.विधी समिती कडील ठ.क्र.६८ दि.५/१०/२०१२

जलक्षेत्र क्र. क/३ अंतर्गत भोसरी चक्रपाणी वसाहत परिसरातील वितरण व्यवस्थेअंतर्गत गुरुत्व वाहिनीवरील थेट पाणीपुरवठा बंद करुन उंच टाकीमार्फत पाणी पुरवठा करणेकामी पांजरपोळ येथील जुन्या टाकी शेजारी नविन उंच टाकी बांधणेकामी येणा-या र.रु.१,१०,००,०००/- ( अक्षरी र.रु.एक कोटी, दहा लाख फक्त ) चे अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

----------

## मा.शहर सुधारणा समितीचे ठराव

विषय क्रमांक १८) संदर्भ :-१) मा. महापालिका आयुक्त यांचेकडील
क्र.नरवि/कावि/रहाटणी/४९३/१२दि.
२०/०७/२०१२
२) मा.शहर सुधारणा समिती कडील ठ.क्र.५५ दि.२४/९/२०१२

मौजे रहाटणी (काळेवाडी) ता.हवेली, जि.पुणे येथील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर विकास योजनेमधील १) रस्ता रुंदी १२.०० मी. रस्त्याचे नांव - आ.क्र.६४६ प्रा.शाळा ते रहाटणी काळेवाडी ४५.०० मी. मुख्य रस्ता स.न.६४, ६५, ६६, ५९, ५८, ५६, ५४, ५३ क्षेत्र १२,३६० चौ.मी. २)  रस्ता रुंदी १२.०० मी. आ.क्र. ६४३ ते ज्ञानेश्वरी मंगल कार्यालय स.नं.७६, ७७ क्षेत्र ५७०० चौ.मी., ३) रस्ता रुंदी ९.०० मी. रस्त्याचे नाव  १२.०० मी. रस्ता ते तापकीर बंगला स.नं. ७१ व ७२ क्षेत्र ५४०० चौ.मी. ह्या प्रस्तावित रस्त्यांखालील जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भुसंपादन अधिनियम १९८४ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे पाठविण्यास  तसेच मौजे आकुर्डी येथील धनश्री हॉटेल (मुंबई पुणे रस्ता ) ते गावठाण हद्दीपर्यंत जाणारा १२.०० मी. रुंद रस्त्याचे भूसंपादन करणेस व येणा-या भूसंपादन खर्चास तसेच मौजे चिखली येथील साने चौक ते तळवडे हद्द (शीव) पर्यंतचा अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये १८ मी. रुंदी प्रमाणे सर्वसाधारण सभेमध्ये (दि.२०/०९/२०१२) मंजूर झालेल्या विषयांतर्गत म.प्रा.व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूसंपादन अधिनियम १९८४ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचे भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविण्यास तसेच मौजे तळवडे येथील देहु - आळंदी रस्त्यास मिळणा-या तळवडे ते निगडी २४ मी. रस्त्यामध्ये २४ मी. अन्वये गणेशनगर येथील गट क्र. १७० व १७१ मधील मिळकतधारकांस म.प्रा. व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम  १२६ व भूसंपादन

अधिनियम १९८४ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचे भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविण्यास मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक १९) संदर्भ :-१) मा. महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/
काvि/पिं.सौ./ड-२/१३७/१२ दि. १३/०९/२०१२
२) मा.शहर सुधारणा समिती कडील ठ.क्र.५७
दि.२४/९/२०१२

मौजे पिंपळे सौदागर, ता.हवेली, जि.पुणे येथील (रस्ता रुंदी १८.०० मी., रस्त्याचे नांव -पिंपळे सौदागर येथील गोविंद गार्डन हॉटेल जवळील आरक्षण क्र.३६१ अ उद्यान ते मिलीटरी हद्दीपर्यंत रस्ता, स.नं. - ६७, ३९, ४०, क्षेत्र - ९,००० चौ.मी.) रस्त्यांखालील जमीनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे पाठविणेस तसेच मौजे च-होली येथील नविन पुल ते खडकवासला वस्ती येथे जाणारा ३०.०० मी. रस्ता विकास योजनेत प्रस्तावित करण्यात आला आहे. तरी सदर भागात राहणा-या नागरिकांकरीता सदर रस्ता विकसित होणे आवश्यक आहे. तरी सदर रस्त्याने बाधीत खाजगी मिळकती म.प्रा. व नर.अधि.१९६६ चे कलम १२६ व भूसंपादन कायद्यातील तरतुदीनुसार संपादन करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक २०) संदर्भ :-१) मा.प्रशांत शितोळे, मा.नारायण बहिरवाडे यांचा
प्रस्ताव
२) मा.शहर सुधारणा समिती कडील ठ.क्र.५८
दि.२४/९/२०१२

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील विनापरवाना अनाधिकृत बांधकामे नियमित करणेसाठी जाहिर केलेल्या प्रणालीमध्ये जागेची मोजणी व त्यासाठी येणारा अवास्तव खर्च या किचकट बाबी लक्षात घेता कमी क्षेत्रफळाकरीता (२.५ गुंठे = २५०० स्क्वे. फुट) सदर अट शिथील करावी. तसेच दि.१९/०५/१९९७ चे मनपा सभा ठराव क्र.३४६५ नुसार मंजूर असलेल्या व वेळोवेळी ठरलेल्या दरांचा अवलंब सदर बांधकामे नियमित करणेचा विचार केला तर सुमारे रु.५००/- प्रति चौ.फुट इतका दंड सर्वसाधारण नागरिकांना भरावा लागणार आहे. आपल्या उद्योग नगरीतील कष्टकरी कामगार वर्गाला हा दंड परवडणारा नाही व झेपावणारा नाही. मनपाकडून शहरातील मनपा हद्दीतील बांधकामे दंडात्मक कारवाई करुन नियमित करीत असतांना खालीलप्रमाणे दंडाची आकारणी करणेस मा.महापालिका सभेची मान्यता घेऊन सदर प्रस्ताव मा. महाराष्ट्र शासनास पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | बांधकामाचे क्षेत्र | दंड आकारणी |
| --- | --- | --- |
| १ | ३००० चौ. फुटापर्यंत | रु. २५/- प्रति चौ.फुट |
| २ | ३००० ते ५००० चौ.फुटापर्यंत | रु. ५०/- प्रति चौ.फुट |
| ३ | ५००० ते १००००चौ.फुटापर्यंत | रु. १००/- प्रति चौ.फुट |
| ४ | १०००० चौ.फुटापेक्षाजास्त | रु. ५००/- प्रति चौ.फुट |

वरील प्रमाणे व त्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकारचे प्रशमन शुल्क न आकारता अनधिकृत बांधकामे नियमित होणेकरीता मा. शासनास तातडीने प्रस्ताव पाठविणेत यावा.

विषय क्रमांक २१) संदर्भ :-१) मा. महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/कावि/
४क/३९०/१२दि. १५/०९/२०१२
२) मा.शहर सुधारणा समिती कडील ठ.क्र.५९
दि.०५/१०/२०१२

मौजे मोशी येथील आरक्षण क्र.१/१६८ स्मशानभुमी विस्तार व आरक्षण क्र.१/१६९ प्राणी दहनभूमी या प्रस्तावाने बाधित होणा-या खाजगी मिळकतींचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ (२) व भूसंपादन अधिनियम १८९४ चे तरतुदीनुसार भूसंपादन करावे लागेल. या भूसंपादनास व याकामी येणा-या खर्चास ( संबंधित भूमिसंपादन अधिकारी कळवतील ती नुकसान भरपाईची रक्कम ) मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक २२) संदर्भ :-१) मा.शुभांगी बो-हाडे, मा.नारायण बहिरवाडे यांचा प्रस्ताव
२) मा.शहर सुधारणा समिती कडील ठ.क्र.६०
दि.०५/१०/२०१२

विशालनगर पिंपळे निलख प्रभाग क्र.५४ मध्ये विशालनगर पिंपळे निलख असा ८० फुट डी. पी. रस्ता आहे. सदर रस्त्याला लागून श्री कोबल यांची कॉलनी आहे. त्या कॉलनीमध्ये जाताना ९० फुट वाकडा रस्ता जात आहे. तरी सदर रस्ता २०५ अन्वये सरळ करुन कार्यवाही करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक २३) संदर्भ :-१) मा.शुभांगी बो-हाडे, मा.नारायण बहिरवाडे यांचा प्रस्ताव
२) मा.शहर सुधारणा समिती कडील ठ.क्र.६१
दि.०५/१०/२०१२

पिंपळे निलख ते बाणेर असा ६० फुट डी. पी. मधील रस्ता मुळा नदीला लागून दक्षिण उत्तर आहे. सदर रस्ता डी. पी. मध्ये थोडा वाकडा प्रस्तावित केला आहे. त्यामुळे गोरगरीबांची १८ घरे बाधीत होत आहेत. सदर रस्ता सरळ केल्यास १८ नागरिकांची घरे वाचणार आहेत व रस्ता सुध्दा सरळ होणार असल्याने ३७ अन्वये कार्यवाही करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

----------

**मा.विशेष समित्यांचे वृत्तांत**

**मा.विधी समिती**

विषय क्रमांक २४) (अ) दिनांक १७/८/२०१२ (दु.३.०० व दु.४.००) व ३१/८/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे

(ब) दिनांक ७/९/२०१२ व २१/९/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे

(क) दिनांक २१/९/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे

-------

**मा.महिला व बालकल्याण समिती**

विषय क्रमांक २५) (अ) दिनांक ८/८/२०१२, २२/८/२०१२ (दु.१.४५ व दु.३.१५) चा सभावृत्तांत कायम करणे

(ब) दिनांक १२/९/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे

--------

**मा.शहर सुधारणा समिती**

विषय क्रमांक २६) (अ) दिनांक १६/८/२०१२, ५/९/२०१२ व ७/९/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे

(ब) दिनांक ७/९/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे

(क) दिनांक २०/९/२०१२ व २४/९/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे

**मा.क्रिडा समिती**

विषय क्रमांक २७) (अ) दिनांक १६/८/२०१२ व ५/९/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे

(ब) दिनांक ५/९/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे

-------

**मा.अ प्रभाग समितीचे ठराव**

विषय क्रमांक २८) संदर्भ- १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्रमांक भूजि/२/कावि/४८६/२०११ दिनांक ५/१२/२०११

२) मा.अ प्रभाग समितीकडील ठ.क्र.२७ दि.१०/८/२०१२

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.१३२ दि.२०/९/२०१२ अन्वये

अजंठानगर श्रेणीवाढ योजना येथील रिक्त ११ गाळे २५ वर्षाच्या दिर्घ मुदतीच्या भाडेपट्टाने (लिजने) वितरीत करणेकामी मा.उपसंचालक, नगररचना विभाग यांनी निश्चित केलेल्या दराप्रमाणे निविदा मागविणेत आल्या असून गाळा क्र. इ ८-Si करिता श्री.चंद्रकांत

सुर्यकांत संकपाळ यांचा सर्वोच्च निविदा दर र.रु. ७,१५,०००/- (मनपा/शासन कराव्यतिरिक्त) लक्षात घेता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (क) नुसार श्री. संकपाळ यांना गाळा क्र. इ ८-Si २५ वर्षाच्या लिजने देणेसाठी मा.महापालिका सभेची मान्यता देणेकामी शिफारस करणेत येत आहे.
(टिप- माहे आक्टोबर-२०१२ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे )

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस /४/कावि/१२५३/२०१२
दिनांक :- ०९/१०/ २०१२

टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे [ डॉकेटस ]
नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.